## भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका, भिवंडी.
## पाणी पुरवठा विभाग

**विषय :- सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्यें १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या हद्दीत १) गौतम कंपाऊंड नवीवस्ती (२५ एम.एल.डी.), शांतीनगर (१५ एम.एल.डी.), पोगांव (२ एम.एल.डी.), नुरीनगर (२ एम.एल.डी.), आझाद नगर (२ एम.एल.डी.) व वऱ्हाळदेवी (५ एम.एल.डी.) असे एकुण ६ क्लोरीनेशन प्लॅन्ट आहेत.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे स्वत:चे गौतम कंपाऊंड नविवस्ती येथील क्लोरिनेशन प्लॅन्ट मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या तानसा जलवाहिनी मधून येणाऱ्या २५ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २.५ पी.पी.एम. क्लोरिनची मात्रा देण्यात येत होती. गौतम कंपाऊंड नविवस्ती येथील बृहन्मुंबई महानगरपालिकेची जुनी जलवाहिनी खराब झाल्यामुळे सदर जुनी जलवाहिनी बंद करुन दुसऱ्या नविन जलजोडणी देण्यांत आली आहे. परंतु नवीन जलवाहिनी मधून होणाऱ्या पाणी पुरवठ्याला क्लोरीनची मात्रा निरंक येत असून सदर पाणी पुरवठा भिवंडी शहरांत वितरीत झाल्यास जलजन्य आजाराचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सदर पिण्याच्या पाण्याला क्लोरीनची २ पी.पी.एम. पर्यंत क्लोरीन गॅसची मात्रा देणे जरुरीचे आहे.

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेचे स्वत:चे नव्याने बांधण्यात आलेले क्लोरीनेशन प्लॅन्ट कार्यान्वित करण्यांत आलेले आहेत. सदर क्लोरीनेशन प्लॅन्टमध्ये २) शांतीनगर - १५ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा, ३) पोगांव - २ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा, ४) नुरीनगर - २ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा, ५) आझाद नगर - २ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा ६) वऱ्हाळदेवी - ५ द.ल.लि. पिण्याच्या पाण्याला २ पी.पी.एम. ची मात्रा देण्यात येते.

भिवंडी शहरातील नागरीकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवठा करणे कामी सदर सर्व क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये सन २०२३-२४ या वर्षाकरीता १) गौतम कंपाऊंड नविवस्ती - १८२ क्लोरीन गॅस सिलेंडर, २) शांतीनगर - ९१ क्लोरीन गॅस सिलेंडर, ३) पोगांव - ७३ क्लोरीन गॅस सिलेंडर, ४) नुरीनगर - ७३ क्लोरीन गॅस सिलेंडर, ५) आझाद नगर - ७३ क्लोरीन गॅस सिलेंडर व ६) वऱ्हाळदेवी - ९१ क्लोरीन गॅस सिलेंडर असे एकुण ५८३ क्लोरीन गॅस सिलेंडरची आवश्यकता आहे.

त्याकरीता खुल्याबाजारातुन दर प्राप्त करुन प्राप्त किमान दरांपैकी १०० किलो क्लोरीन गॅस सिलेंडर सर्व करांसहित प्रति नग ₹८०००/- याप्रमाणे सर्वांत कमी दराचे दर प्राप्त झालेले आहेत. त्यानुसार सदर कामाकरीता ₹४६,६४,०००/- मात्रचे अंदाजपत्रक तयार करण्यांत आलेले आहे.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम |
|---|---|---|
| १ | **सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबत.** | रु.४६,६४,०००/- |

सद्य कार्यकाळात मा. महासभा व मा. स्थायी समिती संपुष्टात आलेली आहे. शासन आदेश क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जुन २०२२ रोजी नुसार मा. महासभा व मा. स्थायी समिती अस्तित्वात नसल्याने भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेसाठी प्रशासक नियुक्त करण्यात आलेले आहेत. त्यामुळे भिवंडी निजामपुर शहर महानगरपालिकेचा कार्यभार हे प्रशासक पहात आहेत. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार निविदा विषयक संविदा करण्याचे अधिकार मा. प्रशासक यांना आहेत.

उपरोक्त नमुद पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) ई-निविदा मागविणे कामाच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतच्या कामास आर्थिक व प्रशासकिय मान्यता मिळाली असुन महा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करुन पुढील कार्यवाही करणे कामी मंजुरी देणे बाबतचा प्रस्ताव.

**प्रशासकिय ठराव क्रमांक : ९४** **दिनांक : २८/०३/२०२३**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) र ४६,६४,०००/- मात्रच्या प्रस्तावाची ई-निविदा मागविणे कामीच्या प्रशासकिय ठरावास मान्यता मिळणे बाबतचा प्रस्ताव कार्यकारी अभियंता व अति. आयुक्त यांनी शिफारस केल्यानुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन निर्णय क्र. एमसीओ-२०२०/प्र.क्र.७१(भाग-२)नवि-१४, दि.०६ जून २०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषतः कलम ४५२ अ च्या (१अ) व (१ब) मधील तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी, विजयकुमार म्हसाळ, प्रशासक तथा आयुक्त भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका पाणी पुरवठा विभागाकडील सन २०२३-२०२४ या वर्षाकरीता महानगरपालिकेच्या हद्दीतील गौतम कंपाऊंड नविवस्ती, शांतीनगर, पोगांव, नुरीनगर, आझादनगर व वऱ्हाळादेवी येथील क्लोरीनेशन प्लॅन्ट मध्ये १०० किलो क्षमतेचे क्लोरीन गॅस सिलेंडर भरुन पुरविणे बाबतच्या प्रस्तावाची (बारा महिन्यांकरीता) र ४६,६४,०००/- मात्रच्या प्रस्तावाची ई-निविदा महा-ई-टेंडर पोर्टलवर प्रसिद्ध करुन पुढील कार्यवाही करणेकामी मंजुरी देत आहे.

(विजयकुमार म्हसाळ)
प्रशासक तथा आयुक्त
भिवंडी नि.शहर महानगरपालिका,भिवंडी.